**NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE**

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(सायंकाळ)

---

**दिनांक २२.०४.२०२६ बुधवार**

**१) परिमंडळ क्र. ०४ नागपूर शहर अंतर्गत कोबिंग ऑपरेशन व अवैध दारू विरोधी विशेष मोहिम राबविलेबाबत.**

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय अंतर्गत परिमंडळ क्र. ४ हद्दीत, दिनांक २१.०४.२६ चे २३.०० ते दि. २२.०४.२६ चे ०२.०० वा. पर्यत कोंबिंग ऑपरेशन व अवैध दारू विरोधी विशेष मोहिम राबविण्यात आली. ऑपरेशन दरम्यान, तडीपार, एमपीडीए, मकोका व शरीरा विरूध्द गुन्हे करणाऱ्या आरोपींच्या घरी जावून घरझडती घेण्यात आली. अवैध दारूविरोधी विशेष मोहिमेमध्ये हॉटेल/ढाबा चालकांकडून बेकायदेशीररित्या मद्य विक्री व मद्यपानासाठी सुविधा उपलब्ध करून देण्याविरूध्द महा. दारूबंदी कायदा अंतर्गत कठोर कारवाई करण्यात आली मोहिमेत दारूबंदी, प्रतिबंधात्मक कारवाई, कोटपा कायदा तसेच विविध गुन्हयांमध्ये मोठ्या प्रमाणावर कारवाई करण्यात आली असून हॉटेल्स, लॉजेच व संशयीत आरोपींची सखोल तपासणी करण्यात आली. कोंबिग ऑपरेशनमध्ये महा. दारूबंदी कायद्यान्वये – २० कारवाई करून गुन्हे दाखल करण्यात आले तर एनडीपीएस अन्वये ०२ कारवाई करण्यात आल्या. पोलीस ठाणे अभिलेखावरील हद्दपार, जेलरिलीज, वारंवार गुन्हे करणारे एकुण ७२ गुन्हेगारांची तपासणी करण्यात आली. तसेच, सार्वजनिक ठिकाणी असभ्य वर्तन करणारे इसमांवर कलम ११०/११७ म.पो.का. अन्वये एकुण ६४ ईसमांवर कारवाई करण्यात आली., कोप्ता कायद्यान्वये एकुण २१ कारवाई करण्यात आल्या निर्धारित वेळेवेक्षा जास्त वेळ सुरू असलेल्या एकुण १२ आस्थापनेवर कारवाई करण्यात आली आहे.

पोलीसांनी विशेष मोहिमे अंतर्गत केलेल्या कारवाईमुळे परिसरात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहून नागरीकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण झाली असून जनतेकडून पोलीसांच्या कार्यवाहीबाबत सकारात्मक प्रतिसाद प्राप्त होत आहे. परिमंडळ अंतर्गत अशा प्रकारच्या प्रभावी व सातत्यपुर्ण मोहिम पुढेही राबविण्यात येणार असून नागरीकांनी कायद्याचे पालन करून सहकार्य करावे असे आवाहन करण्यात येत आहे.

विशेष मोहिम मा. श्री नवीनचंद्र रेड्डी, सह पोलीस आयुक्त, नागपूर शहर,मा. श्री. शिवाजीराव राठोड, अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रभाग) नागपुर शहर, यांचे मार्गदर्शनाखाली मा. श्रीमती रश्मीता राव, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. ४), मा. श्री. नरेंन्द्र हिवरे सहा. पोलीस आयुक्त (अजनी विभाग), मा. श्री प्रदीप सिरसकर, सहा. पोलीस आयुक्त (सक्करदरा विभाग) परिमंडळातील सर्व पोलीस ठाणे येथील प्रभारी अधिकारीसह एकुण ३० अधिकारी व १०० अंमलदार व ०१ आरसीपी प्लाटुन यांनी राबविली.




**<u>२) नंदनवन पोलीसांची कामगिरी :— प्रतिबंधीत तंबाखूजन्य पदार्थ बाळगणाऱ्या आरोपीस अटक.</u>**

मा. श्री. रविंद्रकुमार सिंघल पोलीस आयुक्त नागपुर शहर यांचे आदेशान्वये व मार्गदर्शनात संपुर्ण नागपुर शहरात मादक पदार्थ बाळगणारे व विक्री करणारे आरोपी विरोधात **''ऑपरेशन थंडर''** राबविण्यात येत आहे.

दिनांक २२.०४.२०२६ चे १२.१५ वा. सुमारास, नंदनवन पोलीसांचे पथक पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून, अन्न सुरक्षा अधिकारी यांचेसह पोलीस ठाणे नंदनवन हद्दीत, नंदनवन झोपडपट्टी गल्ली नं. ०१, के.डी.के. कॉलेज जवळ, नंदनवन, नागपुर येथे राहणारा आरोपी नामे चेतन शंकरराव डोडेवार, वय ३७ वर्षे याचे राहते घरी रेड कार्यवाही केली असता, आरोपी हा त्याचे ताब्यात शासनाने प्रतीबंधीत केलेला सुगंधीत तंबाखु, पानमसाला वेगवेगळ्या कंपनीचा व फ्लेवरचे तंबाखु विक्री करीता बाळगुन मिळुन आला. आरोपीचे ताब्यातुन एकुण ३१ कि. ५०० ग्रॅ. वजनी प्रतीबंधीत तंबाखु, पानमसाला, किंमती १९,०००/—रू. चा मुद्देमाल मिळुन आल्याने, जप्त करण्यात आला. आरोपीस अधिक विचारपूस केली असता, त्याने नमूद मुद्देमाल हा परिमल किराणा, स्वराज विहार कॉलोनी, पांदन रोड, वाठोडा, नागपूर येथून आणल्याचे सांगितले. आरोपी हा स्वतःचे आर्थिक फायद्याकरीता शासनाने प्रतिबंधीत तंबाखुजन्य पदार्थ व सुगंधीत पानमसाला बेकायदेशीर व अवैधरित्या विक्री करीता बाळगतांना समक्ष मिळुन आला. आरोपीविरूध्द फिर्यादी अन्न सुरक्षा अधिकारी श्री तात्या गणपतराव लोखंडे, वय ३८ वर्षे यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे नंदनवन येथे आरोपींविरूध्द कलम १२३, २२३(ब), २७४, २७५ भा.न्या.सं. सहकलम ५९ अन्न सुरक्षा मानके अधिनीयम—२००६ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. एका आरोपीस अटक करण्यात आली आहे.

वरील कामगिरी मा. श्री. शिवाजीराव राठोड, अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रभाग) नागपुर शहर, मा. श्रीमती रश्मीता राव, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. ४), मा. श्री प्रदीप सिरसकर, सहा. पोलीस आयुक्त (सक्करदरा विभाग) यांच्या मार्गदर्शनाखाली, वपोनि. कैलास देशमाने, सपोनि. उमाकांत राठोड, पोहवा. योगेश डफ, विश्वजीत उके, मपोहवा. स्वाती कुंभारे यांनी केली.

(गुन्हे)

**<u>पोलीस ठाणे नंदनवन :— प्राणांतीक अपघाताचा गुन्हा दाखल.</u>**

दिनांक १७.०४.२०२६ चे ०४.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे सक्करदरा हद्दीत, मोठा ताजबाग, समोसा मैदान पार्कींग येथे एका अनोळखी इसमाचे दोन्ही पायावरुन ट्रकचे चाक गेल्याने जखमी अवस्थेत त्याना उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल येथे दाखल करण्यात आले होते. उपचारादरम्यान दिनांक १७.०४.२६ चे २०.०० वा. चे सुमारास डॉक्टरांनी त्यास तपासून मृत घोषीत केले होते. प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून पोलीस ठाणे सक्करदरा येथे अकस्मात मृत्यूची नोंद घेण्यात आली होती.

अकस्मात मृत्युचे चौकशीत तसेच, दिनांक २२.०४.२०२६ रोजी फिर्यादी श्रीमती विना प्रदिप रोडे, वय ६० वर्षे, रा. प्लॉट नं. १३, वार्ड नं. २९, लेन्सकार्ट शोरूम जवळ, हुडकेश्वर, नागपूर यांनी पोलीस ठाणे येथे येवून मृतकाचे फोटोवरून त्यांना ओळखून ते त्यांचे पती प्रदीप वसंतराव रोडे, वय ७० वर्षे हे असल्याचे सांगीतले. ते १६.०४.२०२६ रोजी भावाचे घरी जातो असे सांगून घरून गेले होते. फिर्यादीचे पती यांना कोणीतरी अज्ञात ट्रक चालकाने, त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन मृत्युस कारणीभुत झाला. अशा फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पो. ठाणे सक्करदरा येथे मपोउपनि. सावित्री ढगे ८००७७६०६०६ यांनी अज्ञात आरोपी ट्रक चालकाविरूध्द कलम १०६(१) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(मिसिंग)**

**१) पोलीस ठाणे अजनी :–** सौ. अर्पिता श्याम यादव, वय २२ वर्षे, रा. प्लॉट नं. १५, गल्ली नं. ०२, न्यु ज्ञानेश्वर नगर, अजनी, नागपूर ह्या दिनांक २०.०४.२०२६ चे १४.०० वा. पासुन पोलीस ठाणे अजनी हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेल्या. घरी परत आल्या नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आल्या नाही. **वर्णन** रंग– सावळा, चेहरा– लांब, बांधा– सडपातळ, उंची– ५ फुट, केस– काळे लांब, भाषा– हिंदी बोलतात. ओळख– डावे हातावर इंग्रजीत ''यो हनी'' असे गोंदलेले आहे.

**२) पोलीस ठाणे कोराडी :–** कु. सुखसागर साहेबलाल मस्करे, वय २२ वर्षे, रा. नवेगाव, ता. वाराशिवणी, जि. बालाघाट, ह.मु. कवठा नहरजवळ, सुर्यवंशी यांचे विटाभट्टीजवळ, कोराडी, नागपूर ही दिनांक १८.०४.२०२६ चे ०३.०० वा. पासुन पोलीस ठाणे कोराडी हद्दीतुन, राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेली. घरी परत आली नाही. तीचा शोध घेतला असता मिळून आली नाही. **वर्णन** रंग– गोरा, चेहरा– लांब, बांधा– सडपातळ, उंची– ५ फुट ५ इंच, केस– काळे लांब, अंगात– रंगीबेरंगी रंगाचा सलवार सुट व काळ्या रंगाची लॅगीन घातलेली आहे. भाषा– मराठी/हिंदी बोलते.

**३) पोलीस ठाणे अजनी :–** विनय तुषार रामटेके, वय ५१ वर्षे, रा. प्लॉट नं. ५८, श्यामनगर, भगवान नगर रोड, अजनी, नागपूर हे दिनांक १३.०४.२०२६ चे ०७.०० वा. पोलीस ठाणे अजनी हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेले. घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **वर्णन** रंग– सावळा, चेहरा– लांबट, बांधा– सडपातळ, उंची– ५ फुट ३ इंच, केस– काळे–पांढरे, अंगात– पांढऱ्या रंगाचा शर्ट व निळ्या रंगाचा जिन्स पॅन्ट घातलेला आहे. भाषा– हिंदी/मराठी बोलतात.



अर्पिता



सुखसागर



विनय

**(ईतर)**

**आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :–**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, साहेब कोर्ट क्र. ०६ नागपूर | ३०३५०४/२००६ | कलम ३७९, ३४ भा.द.वि. | १) शेख रहुब शेख अयुब, वय १९ वर्षे<br>२) मुथ्थु राजेंद्र स्वामी, वय २६ वर्षे, दोन्ही रा. इंदीरा प्रगतीनगर, वार्ड नं. ०६, महादुला कोराडी,<br>३)शुधोधन वासूदेव सोनटक्के, वय २३ वर्षे, रा. झेंडा चौक, महादुला कोराडी, नागपूर | २४.०४.२०२६ |
| २ | मा. प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, साहेब कोर्ट क्र. ०६ नागपूर | ३०८००२९/२००३ | कलम ३७९, ३४ भा.द.वि. | १) देवकुमार दामोधर शेळके, वय २१ वर्षे, रा. विद्युत विहार कॉलोनी, टाईप/८/१५/१७३<br>२) अमित सायमन ॲन्थोनी, वय २४ वर्षे, रा. बिल्डींग नं. ०२, क्वॉ.नं. ०३,कोराडी, कॉलोनी<br>३) उमेश कृष्णाजी खेडकर, वय २१ वर्षे, रा. ७/२०/११९ कोराडी कॉलोनी, नागपूर<br>४) निलेश परसराम फखीड्डे, वय २१ वर्षे, रा. ई/८८/५२७ कोराडी कॉलोनी | २४.०४.२०२६ |
| ३. | मा. प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, साहेब कोर्ट क्र. ०२ नागपूर | ३०४०२४४/१९९९ | कलम ३४२, ३२४, ३४ भा.द.वि. | १) बेबी अब्दुल्ला आहान, रा. आझाद नगर झोपडपट्टी, गिट्टीखदान, नागपूर<br>२) करूणा मुमताज खान, रा. शेंडे नगर, ढोणेचे घरी किरायाने, जरीपटका नागपूर | २७.०४.२०२६ |

**स्वा/—**

**( अंकुश राठोड )**

**पोलीस उप निरीक्षक,**

**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**

**नागपूर शहर.**